# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१६३/२०२४

पुणे जिल्ह्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली असल्याने त्याचा परिणाम शालेय विद्यार्थी यांच्यावर होऊ नये या करिता मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी पुणे जिल्ह्यातील **भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली, तालुक्यातील खडकवासला परिसर, खेड, आंबेगाव, जुन्नर घाट माथ्यावरील शाळा आणि पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालये** यांना शुक्रवार, दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी सुट्टी जाहीर केलेली आहे.

सदर पार्श्वभुमीवर पुणे जिल्ह्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या करिता विद्यापीठ कार्यालयास दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे.

सर्व संबंधिताना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, परिपत्रक क्र.४९/२०२४, जा.क्र.एएन/११५९, दि.१४/०३/२०२४ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) सभा शनिवार, दिनांक २३ मार्च, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेच्या पूर्वतयारी विषयक कामकाजासाठी शनिवार, दिनांक १६ मार्च, २०२४ (तिसरा शनिवार सुट्टीच्या दिवशी) आणि रविवार, दिनांक १७ मार्च, २०२४ (रविवार सुट्टीच्या दिवशी) या सुट्टींच्या दिवशी विद्यापीठ कार्यालय हे नेहमीप्रमाणे सुरु ठेवण्यात आलेले होते. या सुट्टीच्या दिवशी विद्यापीठ कार्यालयात नियमित कार्यालयीन/ सभेबाबतचे कामकाज पार पाडण्यात आले असून दिनांक १७ मार्च, २०२४ रोजीची पर्यायी सुट्टी शुक्रवार, दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी जाहीर करण्यात येत आहे.

तथापि, विद्यापीठ आस्थापनेतील स्थावर विभाग, सुरक्षा विभाग व आरोग्य केंद्र हे विभाग अत्यावश्यक सेवा म्हणून सदर विभागांचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरु राहील. सदर विभागातील संबंधितांना सदर दिवसाची पर्यायी रजा नंतर देय राहील. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी सबंधितास कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी

25/7/2024

**(प्रा.(डॉ.) विजय खरे)**
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
जा.क्र. : एएन/२७०१
दिनांक : २५/०७/२०२४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

E:\Non-Teaching\2024\Circular\Holiday Circular 2024.docx